पुण्य नगरी । मंगळवार, २५ नोव्हेंबर २०२५ । कोल्हापूर -

# प्रभावी शिक्षणासाठी एआय तंत्रज्ञान आत्मसात करणे गरजेचे : डॉ. पाटील

## विवेकानंद महाविद्यालयात एआय आधारित शिक्षण पद्धतीविषयी कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागातर्फे अग्रणी महाविद्यालय (न्यू कॉलेज क्लस्टर) योजनेंतर्गत 'AI Powered Teaching & Learning : Aligning with NEP २०२०' या विषयावरील कार्यशाळा पार पडली. बदलत्या शिक्षण पद्धतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा योग्य वापर करणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इस्लामपूर येथील संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. सचिन पाटील यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात होते.



राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार Blended Teaching & Learning, Flipped Classroom यासारख्या आधुनिक सुविधांची गरज वाढत आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी काळाच्या बदलांसोबत एआय तंत्रज्ञान आत्मसात करून शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या पद्धती अधिक प्रभावी कराव्या, असेही डॉ. पाटील यांनी स्पष्ट केले. दुपारच्या सत्रात सायबर कॉलेजच्या डॉ. रजनी कामत यांनी 'E-Learning' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.


कार्यक्रमाची सुरुवात संस्था प्रार्थना आणि रोपांना पाणी घालून झाली. प्रास्ताविक आणि स्वागत अग्रणी महाविद्यालय कार्यशाळा समन्वयक डॉ. इरफान मुजावर यांनी केले. आभार संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. विशाल वाघमारे यांनी मानले. या कार्यशाळेला अग्रणी महाविद्यालय (न्यू कॉलेज क्लस्टर) अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमधील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, समन्वयक डॉ. श्रुती जोशी, डॉ. राजश्री पाटील, प्रा. महेश पाटील, प्रा. शुभांगी बैस, प्रा. सोनल औंधकर, प्रा. निकिता हुडे, प्रा. मनीषा दबडे, रजिस्ट्रार एस. के. धनवडे आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

पुण्य नगरी ३ | मंगळवार, २५ नोव्हेंबर २०२५

# ‘विवेकानंद ’मध्ये रासायनिक पृथक्करण विषयक कार्यशाळा

## रसायनशास्त्र विभागात ‘ॲनालिटिकल टेक्निक्स’ विषयावर मार्गदर्शन




**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातर्फे Analytical Techniques Application in Pharmaceutical Analysis and Quality Control या विषयावरील कार्यशाळा अग्रणी महाविद्यालय (न्यू कॉलेज क्लस्टर) योजनेंतर्गत पार पडली. या कार्यशाळेत बी.एस्सी. आणि एम.एस्सी. (रसायनशास्त्र) अभ्यासक्रमातील विद्यार्थी, तसेच अग्रणी महाविद्यालय योजनेतील इतर महाविद्यालयांतील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यशाळेत तज्ज्ञ म्हणून डॉ. रवींद्र गायकवाड (भारती विद्यापीठ फार्मसी कॉलेज) आणि डॉ. अजित एकल (इन्स्टा व्हिजन, सातारा) यांनी उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. औषधनिर्मितीत वापरल्या जाणाऱ्या विविध ॲनालिटिकल टेक्निक्स, उपकरणांचा उपयोग, औषधांचे रासायनिक पृथक्करण, त्यांचा दर्जा टिकवून ठेवण्याची प्रक्रिया आणि लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने त्याचे महत्त्व याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.यासोबतच या क्षेत्रातील रोजगारसंधी, तसेच OJT (On Job Training – NEP नुसार) संकल्पना बी.एस्सी. तृतीय वर्ष आणि एम.एस्सी. विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली.

कार्यशाळेच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, समन्वयक डॉ. श्रुती जोशी, अग्रणी महाविद्यालय समिती समन्वयक डॉ. वर्षा मैंदर्गी आणि विवेकानंद महाविद्यालय अग्रणी महाविद्यालय समन्वयक डॉ. व्ही. बी. वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले. रसायनशास्त्र विभाग प्राध्यापक वर्ग, लीड कॉलेज समन्वयक डॉ. ए. एस. तपासे, विभागप्रमुख डॉ. एस. डी. शिर्के, रजिस्ट्रार एस. के. धनवडे आणि प्रशासकीय कर्मचारी यांनी कार्यशाळेच्या यशासाठी प्रयत्न केले.